शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी—वर्धा

(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्नित)

विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो महाविद्यालय एकक पुरस्कार प्राप्त

# राष्ट्रीय सेवा योजना पथक

'राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर'

दिनांक २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१७

## *विशेष शिबिर अहवाल*

स्थळ : मौजा— पुलई ता. जि. वर्धा

डॉ. रतन चौधरी
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. पुरुषोत्तम कालभूत
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा
महाविद्यालय, पिपरी—वर्धा

श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी – वर्धा

# राष्ट्रीय सेवा योजना पथक

## विशेष शिबिर

राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर
दिनांक २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०१७

अनुक्रमणिका

१. शिबिर अहवाल

२. ग्रामस्थांचे मनोगत

३. शिबिरार्थ्यांची यादी

४. निवासी प्राध्यापक यादी

५. निवडक वृत्तपत्रीय कात्रणे

६. निवडक कृतीपर छायाचित्रे

७. प्रशस्तीपत्र

S. J. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित

श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी–वर्धा

( विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो महाविद्यालय एकक पुरस्कार प्राप्त पथक )

# राष्ट्रीय सेवा योजना पथक

# विशेष शिबिर अहवाल २०१७–१८

## 'राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर' मौजे पुलई ता.जि. वर्धा

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे महाविद्यालयीनस्तरीय 'राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती' या संकल्पनेवर आधारीत विशेष शिबिर दिनांक २३ डिसेंबर २०१७ ते ३० डिसेंबर २०१७ या कालावधीत मौजा पुलई ता.जि. वर्धा येथे शिबिरार्थी व ग्रामस्थांच्या मोठया उत्साहात संपन्न झाले. या शिबिरातर्गत ग्रामविकासाचे वेगवेगळे उपक्रम तसेच ववध समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम शिबिर संयोजक मा. डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांच्या मार्गदर्शनात व शिबिर प्रमुख डॉ. रतन चौधरी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले. या शिबिरामध्ये ४३ मुली व ३२ मुले असे एकूण ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम मा. श्री. डॉ. बाबा सोनटक्के, अधिष्ठाता (कृषी), शिक्षा मंडल, मा. सौ. वंदनाताई बावणे सदस्या पंचायत समिती, वर्धा, मा. श्री. बावणे, सामाजिक कार्यकर्ता, मा. सौ. कांताताई वाघाडे, सरपंच मा. श्री. पद्माकर देशमुख, सदस्य श्री. अमोल मांजरे, अध्यक्ष तंटामुक्ती समिती, मा. श्री. अशोक डांगे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, मा. सौ. पद्माताई हाडके, सदस्या मा. सौ. माधुरी मांजरे, सदस्या मा. सौ. प्रिती भिमटे, सदस्या, मा. श्री. मानवटकर, सेवानिवृत्त शिक्षक, श्री. सुरेश पवार, उपप्राचार्य, मा. श्री. महाजन, शिक्षक, मा. श्री. इंगोले, शिक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास सर्वच ग्रामस्थ बंधु भगिनी यांची उत्साहवर्धक उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात रासेयो च्या ध्वजारोहणाने झाली. रासेयो सांस्कृतिक कला-पथकाने विद्यापीठ गीत, रासेयो गीत सादर करुन शिबिराची वातावरण निर्मिती केली. शिबिर प्रमुख डॉ. रतन चौधरी यांनी प्रास्ताविकातून शिबिर आयोजनाची भूमिका मांडून शिबिर कालावधीत होणा–या उपक्रमांची व दिनचर्येची माहिती दिली. प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांनी मार्गदर्शन केले. सर्व ग्रामस्थ बंधु भगिनिंनी विविध कार्यक्रमात सक्रियतेने सहभागी होऊन संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. प्रमुख अथिती डॉ. सोनटक्के यांनी शिबिर



S. J. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

आयोजनाचे महत्व सांगून शिबिराचे पध्दतशीर नियोजनाचे कौतुक केले. सौ. वावणे यांनी शिबिराच्या माध्यमातून गाव विकासाच्या संधी मिळतात त्यामध्ये गावकऱ्यांचे सहकार्य महत्वाचे असते असे प्रतिपादन केले. इतर मान्यवरांनी शिबिराला शुभेच्छा दिल्या.

## शिबिराची दिनचर्या -

पुलई ग्रामस्थ बंधु भगिनींकरीता शिबिराची दिनचर्या ग्रामविकासाची नवी पहाट फुलविणारी प्रेरणा देणारी ठरली. शिबिरार्थ्यांकरीता अनुभवातून व्यक्तिमत्व विकासाची दिशा देणारी होती. शिबिराच्या दिनचर्येला प्रारंभ पहाटे ५.०० वाजता 'धनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' या मंगल भूपाळीने व्हायचा. सकाळी ५.५५ वाजता सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थिती बरोबरच प्रत्येक गटातील सदस्याच्या हजेरीची माहिती त्या गटाचा नेता सादर करायचा.राष्ट्रगीतानंतर लोकप्रबोधनाच्या विविध विषयावर चिंतन व्हायचे. विशेष म्हणजे चिंतन देणाऱ्यांमध्ये ग्रामस्थांचा सुध्दा सहभाग असायचा. चिंतनाचे प्रेरणादायी व भावस्पर्शी विचार मनात रुजवत जागर दिंडीला उत्स्फूर्त प्रारंभ व्हायचा. या जागर दिंडीत गावातील भजनी मंडळ, ग्रामस्थ सर्वबंधु भगिनी, बालगोपाल या सर्वांचा सहभाग मोठया उत्साहात असायचा. ग्रामस्थ आपल्या घरासमोरील जागा स्वच्छता करुन रांगोळयांनी दिंडीचे मोठया उत्साहात स्वागत करायचे. दारासमोर थोर महापुरुषाचे फोटो ठेवून फुलांच्या रांगोळयासह महापुरूषांचे विचार व महत्व यामधून प्रकर्षाने जाणवत होते.

जनजागृती करण्यासाठी जागर दिंडीमध्ये समाज प्रबोधनपर म्हणी, घोषवाक्य, सुविचार यांच्या घोषणा देण्यात येत असत. 'झाडे लावा एक हजार गाव होईल हिरवेगार', 'मोरीचे पाणी शोषखड्यात सोडा', 'दारुने झिंगला संसार भंगला', 'कावळा म्हणतो काव काव माणसा-माणसा झाडे लाव', 'सफाई में खुदाई है', 'काश्मीर हो या कन्याकुमारी भारतमाता एक हमारी' इत्यादी घोषवाक्य तर 'लावा लावा हो झाड लावा', 'जोडा भारत जोडो भारत', 'हम जवान आझाद वतन के ऑधी से टकरायेंगे' अश्या प्रकारची गीते, स्फूर्ती गीते, देशभक्तीपर गीते शिबिरार्थ्यांसोबत ग्रामस्थ बंधु भगिनी व बालगोपाल उत्साहाने गात असत. यामुळे ग्रामस्थांची मने जोडली गेली. त्यांच्या मध्ये नविन उर्जा व नविन चेतना निर्माण झाली.

जागरदिंडी नंतर डॉ. सुशील चौहाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरार्थी व ग्रामस्थ युवक-युवती सकाळच्या प्रहरी धावणे, योगासने, कवायती करीत असत. शरीर सुदृढ राखण्याकरीता नियमित व्यायामाची गरज असते हा संदेश त्यातून मिळाला. शिबिराचे नियोजन उत्तम असल्यामुळे शिबिराची दिनचर्या घडयाळाच्या



S. J. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI. (WARDHA)

काट्याप्रमाणे चालत असे. वेळेचे महत्व, शिस्त, स्वयंशासन, स्वालंबन, सहकार्य, नम्रता, आदरभाव, सामाजिक बांधिलकी यामुळे शिबिरार्थी व ग्रामस्थांचा आत्मविश्वास दृढ झाला.

## श्रमसंस्कार -

'श्रम ही हैं श्रीराम हमारा' याप्रमाणे विद्यार्थ्यांवर श्रमाचे संस्कार व्हावे, त्यांना श्रमाचे महत्व कळावे या उद्देशाने शिबिर कालावधीत सकाळी ७.३० ते ११.०० या वेळात श्रमसंस्कार प्रकल्प राबविण्यात आला. श्रमसंस्कारचे माध्यमातून शिबिरार्थी व ग्रामस्थ बंधु-भगिनी यांनी गावातील तीन ठिकाणी नालीचे खोदकाम साधारण ३५० फूट लांब १ फुट रूंद व दीड फूट खोल यांप्रमाणे करण्यात आले. शाळेच्या समोर वाहन तळाची (पार्कींग) व्यवस्था करण्यासाठी तेथील मुरूम, दगड उचलून जागा स्वच्छ करण्यात आली. शाळेचे मैदान स्वच्छ करण्यात आले. शाळेच्या परिसरात इतिहासातील घडामोडींबाबत शैक्षणिक प्रतिकृती तयार करण्याचा मानस जि.प. उच्च माध्यमिक शाळेचा आहे. त्यानुसार त्याला लागणारे मोठे दगड शाळेच्या परिसरात जमा करण्यात आले. रस्त्यावर येणारे सांडपाणी रस्त्याच्या बाजूला नाली काढून व्यवस्थित करण्यात आले. पर्यावरणाचा संदेश देण्याच्या उद्देशाने वृक्षारोपणाकरीता ५० ठिकाणी खड्डे करण्यात आले. गावातील रस्त्याची सफाई, तसेच रस्त्यावर असलेल्या शौचावर राखड टाकून रस्ते स्वच्छ करण्यात आले. गावात स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश कृतीमधून देण्यात आला.

ग्रामस्थांचे मनपरिवर्तन केल्यामुळे गाव स्वच्छ व निर्मल करण्याची दिशा त्यांना मिळाली व ग्रामस्थांसमोर स्वच्छतेचा आदर्श निर्माण करण्यासाठी व गाव हगनदारी मुक्त करण्यासाठी शिबिरार्थी, शिबिरार्थीनी यांना वेगवेगळया चराचे संडास याची व्यवस्था करण्यात आली होती. कमी खर्चात शौचालय तयार करण्याबाबत माहिती व मार्गदर्शन देण्यात आले. शौच्यालयासाठी शिबिरार्थी उघडयावर न जाता चराच्या संडासाचा वापर करून स्वच्छतेचा संदेश कृतीमधून गावकऱ्यांना दिला.

## बौध्दिक विकास -

गावाची स्थिती तसेच गावक-यांची गरज व रुची लक्षात घेवून त्यांना विविध विषयावर आधारीत तांत्रिक ज्ञान उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने विषय तज्ञाद्वारा विविध विषयावर मार्गदर्शनाचे सत्र आयोजित करण्यात आले. त्यात 'विविध पिकांवरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन' प्रा. राजेंद्र खर्चे, 'रबी व चारापिके व्यवस्थापन' प्रा. आकाश वादाफळे, 'सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन' व 'शाश्वत स्वच्छतेसाठी जनजागृतीची गरज'-श्री. के.जे. बाळबुधे व सौ. पी. आर. कोरडे, 'माता आणि बालसंगोपन', 'सिकल सेल'-डॉ. आर.पी.



G. S. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI. (WARDHA)

गहलोत व त्यांचा चमू, 'विविध पिकावरील रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन'-डॉ. अमोल झापे, 'मशरूम उत्पादन व प्रक्रिया' -डॉ. प्रशांत धरपाल यांनी मार्गदर्शन केले.

## व्यक्तिमत्व विकास -

युवक - युवतीमध्ये आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टीकोन निर्माण व्हावा, युवकांच्या उर्जेचा वापर विधायक कार्यामध्ये व्हावा व त्यांच्यामध्ये वैचारिक मंथन घडून आणण्याकरीता शिबिरार्थ्यांना विविध स्पर्धाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करुन देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा, गटचर्चा, संस्कार लेखन, समयस्फूर्तभाषण स्पर्धा, स्वतःला ओळखा, प्रश्न मंजुषा इत्यादी व्यक्तिमत्व विकासाला पोषक उपक्रम आयोजित करण्यात आले. सांस्कृतिक विचाराचे आदान प्रदान होऊन राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, सर्वधर्म समभाव, समाजसेवा ही मूल्य शिबिरार्थींना जपाव्या लागतात. शिबिर कालावधीत श्रध्दा, विवेक प्रेम, सहकार्य सामाजिक दायित्व, स्वावलंबन इत्यादि जीवनाला पूरक अशी उदात मूल्य शिबिरार्थीच्या अंगी रुजली .त्यांच्यात सकारात्मक बदल दिसून आला.

## पशुचिकित्सा कृती शिबिर -

शेती हा ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे आणि त्याकरीता पशुधन सुध्दा महत्वाचे ठरते. पशुधनाच्या उपचाराची व औषधोपचाराची सुविधा गावात उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने दिनांक २९.१२.२०१७ रोजी जिल्हा परिषद, वर्धा, पंचायत समिती सेलू व पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ आंजी (मोठी) येथील डॉ. ए.यु. कोल्हे, पशुधन विकास अधिकारी व त्यांचा चमू यांच्या सहकार्याने पशुचिकित्सा कृती शिबिर संपन्न झाले. या शिबिरात कृत्रिम रेतन - ०१ जनावर, गर्भधारणा तपासणी - १८ जनावरे, वंधत्व निदान व उपचार - ७ जनावरे, औषधोपचार - २४ जनावरे, जंतनाशक औषधी पाजणे - ५८, तसेच गोचिड / गोमाशा निर्मुलन - २४ जनावरे. अशा प्रकारे एकूण १३९ जनावरांची तपासणी व उपचार करण्यात आले. शिबिराला पशुपालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. अशाप्रकारचे उपक्रम पुढेही घेण्यात यावेत असे मत पशुपालकांनी व्यक्त केले.

## आरोग्य तपासणी शिबिर -

चांगले आरोग्य माणसाच्या प्रगतीला गती देणारे असते. परंतु ग्रामीण भागात आरोग्याबाबत बरीच उदासिनता दिसून येते. त्याचबरोबर अपुरी आरोग्यसेवा उपलब्ध असल्यामुळे आजाराचे प्रमाण वाढत जाते. या



S. J. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI. (WARDHA)

सर्व बाबी लक्षात घेवून पुलई व पुलई लगतच्या गावातील ग्रामस्थानांसाठी आरोग्य तपासणी सुविधा मिळण्याच्या उद्देशाने 'आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दिनांक २१.१२.२०१७ रोजी करण्यात आले. या शिबिराचा लाभ गावातील तसेच गावालगतच्या गावातील एकूण २०३ रूग्णांनी लाभ घेतला. विशेष म्हणजे सिकलसेल बाबत जनजागृती करून गावकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य तपासनी मध्ये सिकलसेलची तपासनी, सी.बी.सी. तपासणी, हिवताप तपासणी, बी.पी. तपासणी, लहान बालक, वृध्द तसेच किशोरवयीन मुलींची तपासणी करण्यात आली. यारीता जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आणि प्राथमिक आरोग्य केंद्र आंजी (मोठी) यांचे सहकार्य लाभले. यामध्ये आरोग्य अधिकारी डॉ. बहादुरे, डॉ. पवार व त्यांचा चमू यांनी मार्गदर्शन तसेच रूग्णांची तपासणी करून शिबिराला महत्वाचे सहकार्य केले.

## नेत्र तपासणी शिबिर -

जीवनात आपल्याला दृष्टीव्दारे विविध वस्तू तसेच बाबींचे अस्तित्व असल्याचे आकलन होते. त्याकरीता डोळे चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. डोळे तपासणीची सुविधा ग्रामीण भागात नसल्यामुळे डोळयाचे आजार वाढत जातात व त्याचा दुष्परिणाम जीवनावर त्याचबरोबर त्याच्या कुटुंबावर होतो. विशेष शिबिरांतर्गत दि. २७ डिसेंबर व २८ डिसेंबर २०१७ रोजी दोन दिवसीय नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. नेत्र तपासणी शिबिर निःशुल्क होते. या शिबिराचा लाभ ३७७ ग्रामस्थांनी घेतला. नेत्र तपासणी शिबिर बजाज दृष्टी प्रकल्प अंतर्गत जानकीदेवी बजाज ग्रामविकास संस्था, वर्धा यांच्या सहकार्याने श्री. विनेश काकडे व त्यांचा चमू यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. ग्रामस्थांचा याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

## कृषी अवजारे प्रदर्शनी -

ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेती उत्तम रीतीने करण्यासाठी आधुनिक अवजारे व त्याबाबतची तांत्रिक माहिती देणे गरजेचे ठरते. त्याकरीता गावात कृषी अवजारे प्रदर्शनी दि. २८ डिसेंबर २०१७ रोजी श्रमन्नारायण तंत्र निकेतन पिपरी-वर्धा येथील प्रा. चव्हण व श्री. नागोराव यांच्या सहकार्याने आयेजित करण्यात आली. त्यामध्ये शेतीला लागणारी वेगवेगळी अवजारे ठेवण्यात आली होती. कमी खर्चात आधुनिक कृषी अवजारे तयार करणे तसेच त्याच्या वापराबाबतची तांत्रिक माहिती व फायदे याबाबतची माहिती या प्रदर्शनीमध्ये शेतकऱ्यांना देण्यात आली. गावातील शेतकऱ्यांनी कृषी अवजारे प्रदर्शनीचा लाभ घेतला.



G. S. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

## विद्युत उपकरण दुरूस्ती शिबिर -

गावात विद्युत उपकरण दुरूस्तीबाबत अडचणी लक्षात घेवून ती सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने दि. २८ डिसेंबर २०१७ रोजी श्रीमन्नारायण तंत्र निकेतन पिपरी-वर्धा यांच्या सहकार्याने विद्युत उपकरण दुरूस्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पंखा, इस्त्री, मिक्सर अश्या प्रकारची उपकरणे दुरूस्त करण्यात आली. ग्रामस्थांनी या संधीचा लाभ घेतला.

## खेळ -

खेळ हा आपल्या आरोग्याकरीता अधिक महत्वाचा आहे. खेळामुळे आपल्यामध्ये एक वेगळी उर्जा निर्माण होते. शिबिराच्या दिनचर्येप्रमाणे सायंकाळी विविध स्पर्धा, मैदानी खेळ घेण्यात येत असत. त्यामुळे शरीराला चांगले वळण लागण्याबरोबर स्फूर्ती, ताजेपणा, चैतन्य, तसेच शरीरात रक्त संचार चांगल्या पध्दतीने होत असल्यामुळे मनसुध्दा प्रसन्न राहावयास मदत होते. कबड्डी खो-खो, व्हॉलीबॉल व सामाजिक खेळ गट-गटामध्ये खेळले जात असत. ग्रामस्थ युवक व शिबिरार्थी एकत्र मिळून खेळाचा आनंद घ्यायचे. त्यामुळे युवक युवतींमध्ये मोठा उत्साह निर्माण होत असे.

## प्रार्थना -

मन प्रफुल्लीत होण्याकरीता प्रार्थना उपयुक्त ठरते. प्रार्थनेमुळे मन प्रसन्न होऊन शरीरात नविन उर्जा संचारण्याचे कार्य होत असते. शिबिरात दररोज सांयकाळी ६.०० ते ६.३० या वेळात प्रार्थनेचे आयोजन करण्यात यायचे स्फूर्तीगीते, जागरगीते, देशभक्तीपर गीतांचे गायन झाल्यानंतर प्रार्थनेला प्रारंभ होत असे. 'इतनी शक्ती हमें दे ना दाता', 'खरा तो एकचि धर्म' या प्रार्थनेबरोबरच अभंग, गौळणी, भजन यांचे सामुहिक गायन व्हायचे. यामुळे शिबिरार्थी व ग्रामस्थांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन सकारात्मक विचार करण्यास ते प्रवृत्त होत असत.

## सांस्कृतिक कार्यक्रम -

ग्रामस्थांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम हे एक प्रभावी माध्यम आहे. पुलई येथे शिबिराअंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे प्रभावी लोकप्रबोधन करण्यात आले. नियोजित वेळेनुसार कार्यक्रमाला प्रारंभ व्हायचा. रासेयो सांस्कृतिक कलापथकाद्वारे पथनाटय, नकला, जागरगीते, स्फूर्तीगीते, देशभक्तीपर गीते, तुंबडी गीते इत्यादी द्वारा, व्यसनमुक्ती, पर्यावरण, वृक्षरोपन, स्त्रीभृणहत्या,



GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

धुम्रपान, तंबाखु व गुटखा सेवन, अंधश्रध्दा, साक्षरता, राष्ट्रीय एकात्मता, हगणदारीमुक्त गाव, ग्रामीण स्वच्छता इ. विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. 'भोंदूबाबाची भंबेरी', 'आम्ही लेकी कष्टकऱ्यांच्या', 'कचरापेटी' 'स्त्रीभ्रूणहत्या', 'ग्रामीण स्वच्छता', 'आपण सारे एक', 'गांधी तुम्हारे देश में', 'थांबा काय करतां' 'जलसाक्षरता' अशा विविध विषयावरील पथनाटयासोबतच नाट्यछटा, मुकनाट्य, लोकनृत्य, आदिवासी नृत्य, तसेच विविध प्रकारची लोकगीते सादर करण्यात आली. पुलई येथील ग्रामस्थ युवक-युवती तसेच बालकांनी त्यांचे लोककलात्मक कार्यक्रम सादर केले. प्राथमिक शाळा व अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. आदर्श गुरुदेव सेवा भजनी मंडळ व इतर भजनी मंडळ यांनी लोक प्रबोधन केले. समाजाचे प्रबोधन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार समाजात रुजविण्यासाठी लोकप्रिय सप्तखंजेरीवादक कीर्तनकार श्री. भाऊ धुटे यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमाने ग्रामस्थ प्रभावित झाले. तसेच लोकप्रिय खंजेरीवादक श्री. शुभम मुरले यांनी किर्तनाव्दारे समाजप्रबोधन केले.

## रांगोळी स्पर्धा -

शिबिरातील प्रत्येक कार्यक्रमात ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग दिसून आला. महिला सुध्दा मोठया प्रमाणात सहभागी व्हायच्या. त्यांच्या करीता रांगोळी स्पर्धेचे आयोजन जि.प. उच्च प्राथमिक शाळेच्या प्रांगणात करण्यात आले. महिला व युवतींनी मोठया प्रमाणात रांगोळी स्पर्धेत सहभाग घेतला. रांगोळीच्या माध्यमातून वेगवेगळा संदेश सुध्दा देण्याचा प्रयत्न गावातील महिलांनी केला. रांगोळयांचे मूल्यमापन करून पारितोषिके देण्यात आले. यामध्ये श्री. साहिल ढोक यांनी 'आम्हांला न्याय द्या' या आशयाची उत्कृष्ट रांगोळी काढून प्रथम क्रमांक मिळविला. व्दितीय क्रमांक सौ. शकुंतला नेहारे यांनी 'झाडे लावा झाडे जगवा' या आशयाच्या रांगोळीला मिळाला. तृतीय क्रमांक 'आई मला जगू दे' असा संदेश रांगोळीतून देऊन कु. किशोरी कंगाले हिने प्राप्त केला. तसेच प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात आली.

## ग्रामस्वच्छता -

ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी 'राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवशक्ती शिबिर' या संकल्पनेवर आधारित विशेष शिबिरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये दोन प्रकारच्या स्वच्छतेवर भर देण्यात आला. एक मनाची स्वच्छता व दुसरी परिसर स्वच्छता. मनाच्या स्वच्छतेकरीता शिबिरामध्ये जागर दिंडी भजन, लोकनृत्ये, पथनाट्ये, स्फूर्तीगिते, राष्ट्रभक्तीपर गीते इत्यादिंच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले. तर बौध्दिक सत्रात 'घनकचरा व्यवस्थापन', 'शाश्वत स्वच्छतेसाठी



S. J. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

जनजागृतीची गरज' याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गावाचा परिसर स्वच्छतेकरीता ग्रामस्थ व शिबिरार्थींनी संपूर्ण गाव स्वच्छ केले. नालीची सफाई, सांडपाण्याची व्यवस्थाकरण्यासाठी रस्त्याच्या बाजूला नाली काढण्यात आली. नालीचे खोदकाम, रस्त्यावरील शौचावर राख टाकून घान साफ करण्यात आली. अशा प्रकारे शिबिरार्थी व ग्रामस्थांनी हातात झाडू घेवून गाव स्वच्छ करत कृतीतून स्वच्छतेचा संदेश दिला.

## शिबिर समारोप समारंभ -

सात दिवस चाललेल्या शिबिराच्या समारोप दिनांक ३० डिसेंबर २०१७ प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांच्या अध्यक्षतेखाली व मा. सौ. जयश्रीताई गफाट, सभापती-शिक्षण, क्रिडा व आरोगय समिती जिल्हा परिषद, वर्धा, मा. श्री. सुनिलभाऊ गफाट, सामाजिक कार्यकर्ता व मा. सौ. कांताताई वाघाडे, सरपंचा मा. श्री. भास्करराव खरकाडे, उपसरपंच, मा. श्री. पद्माकर देखमुख, सदस्य, मा. श्री. अशोकराव डांगे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, मा. सौ. पद्माताई हाडके, सदस्या, मा. सौ. प्रिती भिमटे, सदस्य, सौ. मंगलाताई देशमुख, मा.श्री. अशोकराव तिनहासे, माजी सैनिक, श्री. सुधाकरराव नाखले, सरपंच खैरी(कामठी), प्रा. एस.एम. पवार, उपप्राचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. मान्यवरांनी ग्रामस्थ व शिबिरार्थ्यासोबत श्रमसंस्कारामधून गावात केलेल्या कामाची पाहणी केली. त्यानंतर कार्यक्रमास्थळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यांत आले. या प्रसंगी रासेयो गीत व विद्यापीठ गीत सादर करण्यात आले.

शिबिरादरम्यान राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती शिबिरप्रमुख डॉ. रतन चौधरी यांनी प्रास्ताविक व अहवाल वाचनातून सादर केली. ग्रामस्थ श्री. अशोकभाऊ डांगे, श्री. पद्माकर देशमुख, श्री. प्रफुल इंगोले, श्री. राम हाडके, श्री.बावणे, श्री. ढोके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरार्थ्यांकडून श्री. कविता भुरमूसे व श्री. जिवन कोडापे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शिबिरार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण व रांगोळी स्पर्धेचे बक्षिस वितरण करण्यात आले. मुख्य अतिथी श्री. सुनिल गफाट व सौ. जयश्रीताई गफाट यांनी उत्कृष्ट पध्दतीने शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले. ग्रामस्थांसाठी हे शिबिर विकासाची नवी दिशा देणारे ठरले व अश्या प्रकारचे उपक्रम पुढेही राबविण्यात यावे अशी विनंती केली. उत्तम रितीने शिबिर आयाजित केल्यामुळे ग्रामस्थांनी शिबिर संयोजक डॉ. पुरुषोत्तम कालभूत व शिबिर प्रमुख डॉ. रतन चौधरी यांचा सत्कार केला. संरपंचा सौ. वाघाडे यांनी शिबिराकरीता गावाची निवड करून गावकऱ्यांमध्ये मनपरिवर्तन घडवून आणण्याचे मोठे कार्य शिबिरार्थ्यांव्दारा झाले. असे उपक्रम पुढेही व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात शिबिरार्थी व ग्रामस्थांनी



GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA S. J. PIPRI (WARDHA)

केलेली गावविकासाची कामे ग्रामस्थांनी पुढे न्यावीत व आदर्श ग्राम निर्माण करण्याकरीता सर्वांनी एकत्र येवून कार्य कार्य करावे असे आवाहन ग्रामस्थांना केले. शिबिरामध्ये शिबिरार्थ्यांसोबत ग्रामस्थांचा सहभाग व सहकार्यांबाबत आनंद व्यक्त केला. समारोप कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. रतन चौधरी यांनी केले. कार्याक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सलीम शेख यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप सामुदायिक प्रार्थना 'खरा तो एकची धर्म' ने झाला.शिबिर समारोपाच्या भवस्पर्शी सोहळयानंतर शिबिरादरम्यान राबविण्यात आलेले उपक्रम व रचनात्मक कार्याचा वसा आपल्या आयुष्यात जपण्याचा सकल्प करून शिबिरार्थी व ग्रामस्थांनी साश्रूनयनांनी एकमेकांचा निरोप घेतला. अश्या प्रकारे पुलई येथील शिबिर ग्रामविकासाची नवी दिशा देणारे ठरले.

शिबिराच्या यशस्वीतेकरीता प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनात, डॉ. रतन चौधरी यांच्या नेतृत्वात, डॉ. सुशिल चौहान सहकार्यक्रम अधिकारी व प्रा. बिना सॅम्युअल, प्रा. गोपाल उपासे, प्रा. राजेद्र वरकल, प्रा. मनोज येल्टीवार, प्रा. देवेंद्र वसू, प्रा. संजय दुधबडे, प्रा. शैलेंद्र जांभुळकर, प्रा. सलिम शेख, प्रा. चंद्रशेखर पवार, प्रा. शिरीष सुतार, प्रा. सुरेश पवार, डॉ. अजय किनखेडकर, प्रा. भगवान जक्कुलवार, प्रा. प्रविण बैस, श्री. सुभाष अलवाडकर, श्री. संजय फुलझेले, श्री. संजय सपाटे, श्रीमती पाटील, कु. मोकादम, श्री. बाबा क्षिरसागर, श्री संदीप गायकवाड, श्री. श्याम सावरकर, श्री. राम डाहाके, श्री. प्रफुल इंगोले, श्री. बावणे, श्री. ढोके आणि समस्त बंधु आणि भगिनी तसेच शिबिरार्थी युवक - युवतींनी अथक परिश्रम घेतले व यशाचे मानकरी झाले.

डॉ. रतन चौधरी
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

कार्यक्रम अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा
महाविद्यालय, पिपरी - वर्धा.

डॉ. पुरूषोत्तम कालभूत
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

प्राचार्य,
श्रीकृष्णदास जाजू
ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी, (वर्धा)



S. J. GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

शिक्षा मंडल, वर्धा

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी –वर्धा

## राष्ट्रीय एकात्मता व ग्रामस्वच्छता अभियानासाठी युवाशक्ती शिबिर

## मौजे पुलई ता. जि.– वर्धा

## दि. २३ ते ३० डिसेंबर २०१७

---

शिबिरार्थ्यांचे मनोगत

कु. स्वाती लोहारे

बी.ए. (आर.एस.) भाग ३

शिबिराला जायचे की नाही असा विचार मनात आला आणि शिबिराला गेली तर आठ दिवस आई वडीलांना सोडून राहावे लागेल, आई वडिलांची आठवण येईल परंतु या अगोदर मी शिबिर केलेले असल्यामुळे मी परत शिबिराला जायचे ठरविले कारण शिबिर उत्तम व शिस्तबध्द पध्दतीने आयाजित केले जाते आणि त्यामधून खूप काही शिकायला मिळते.

पुलई या गावातील लोकांची या शिबिराबद्दल असलेली आपुलकीची भावना पाहून मला तर आश्चर्य वाटले. पहिल्या दिवसापासून या गावातील युवकांचा, ग्रामस्थांचा आणि महिलांचा फार मोठा सहभाग या शिबिरात असल्यामुळे महिला तर आवर्जून सांस्कृतिक कार्यक्रम पहायला येत होत्या.

दररोज पहाटे जागर दिंडीत असा अनुभव आला की, ज्याला कोणाला स्वर्ग बघायचा असेल तर त्यांनी या पुलई शिबिरातील आठ दिवसांपैकी एक दिवस तरी भेट दिली असती तर स्वर्गाच्या आनंदाचा अनुभव घेता आला असता.

पहाटे मंजुळ स्वरात ती ऐकू येणारी भूपाळी 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा' मनाला एक अलौकिक आनंद देवून जात होती. त्यानंतर एखादया चांगल्या विषयावर चिंतन सादर केल जात होत. म्हणजे असे म्हणता येईल की, सकाळी आमच्या मनावर चांगल्या विचारांचं रोपण होत असे.

मला माझ्या हाताचा उपयोग जेवण करण्यासाठी व पुस्तक पकडण्यासाठी होतो ऐवढेच माहित होते परंतु या शिबिरामुळे या हाताचा उपयोग श्रमदान करण्यासाठी होतो हे मला माहित झाले. मुलींची काम करण्याची क्षमता किती असते हे या शिबिरातून मला समजले. मुलींनी नालीचे खोदकाम, ग्रामसफाई अशी श्रमाची कामे सुध्दा केली. आम्ही काम करतांना कधीच थकलो नाही.

शिबिरातील मुलांनीही न थकता काम केले. दिवस कसा निघून जायचा हे कळतचं नव्हतं. मला तर कधी आई वडिलांची व दूरदर्शनची आठवण आली नाही. आमच्या प्रा. बिना सॅम्युअल मॅडम यांनी आमची फार काळजी घेतली त्यामुळे आम्हांला आईची गरजच भासली नाही. मला शिबिरातून असा अनुभव आला की जे जेवण आम्ही करत होतो तेच जेवण आमचे प्राचार्य व प्राध्यापक आमच्या सोबत बसून करत होते. आमच्या सोबतच आमच्या मॅडम सुध्दा खाली झोपत होत्या. आमच्यामधील सुप्त कला – गुण कळले. ज्या मुली बोलायला घाबरत होत्या त्या बोलायला लागल्या.

या शिबिराबद्दल जेवढे सांगावे तेवढे कमीच आहे. मला तर असे वाटते की मी जर या शिबिरात सहभागी झाले नसते तर माझे खूप नुकसान झाले असते कारण येथून मला खूप काही शिकायला मिळाले. माझ्या चुका मला कळायला लागल्या, वेळेचे महत्व कळले. हे शिबिर नेहमीच माझ्या लक्षात राहील.

मी शिबिरप्रमुख श्री. डॉ. रतन चौधरी सर यांना धन्यवाद देते की त्यांनी मला या शिबिरामध्ये सहभागी करून घेतले, मी त्यांची आभारी आहे.

GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

ग्रामस्थाचे मनोगत

नाव:– श्री. राम हाडके

शिबिरात सकाळी पहाटेला ५.३० वाजता जागर दिंडी निघत होती यामध्ये अंधश्रध्दा निर्मुलन, व्यसनमुक्ती, स्वच्छतेवर विविध नारे देवून प्रबोधन केले. रोजच्या कार्यक्रमात जागर दिंडी, रांगोळी स्पर्धा, समाजप्रबोधनपर कार्यक्रम, सांस्कृतीक कार्यक्रम, स्त्रीभ्रुण हत्या, सामाजिक एकात्मता, स्वच्छता, व्यसनमुक्तीतसेच पथनाट्य असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. इत्यादी गोष्टींपासून आम्ही खूप काही शिकलो. या सर्व गोष्टींचा परीणाम तरूण पिढीवर नक्कीच झाला. दुपारच्या सत्रात विविध कार्यक्रम घेवून त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, प्रदर्शनी, मशरूमची माहिती इ. कार्यक्रमातून गावातील लोकांना चांगला संदेश मिळाला.

राष्ट्रीय सेवा योजनेचा महत्वाचा भाग म्हणजे श्रमदान. यां श्रमदानाच्या माध्यमातून आमच्या गावात खूप काही कामे करण्यात आली. त्यामध्ये गावाजवळ वनराई बंधारा बांधला ज्याची लोकांना आवश्यकता होती. शोषखड्डे व वृक्षारोपनाचा कार्यक्रम राबवून गावविकास साधला. आरोग्य विभागामार्फत रोगनिदान शिबिर, जनावरांचे शिबिर या माध्यमातून कार्यक्रम राबविण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजने मार्फत गावातील युवकांचे मत परिवर्तन झाले असे मला दिसून आले कारण शिबिर समाप्त झाल्यानंतर जे लोक उघडयावर हगणदारी करायला जात होते ते लोक आता संडासचा वापर करीत आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामुळे गावातील विकासाला नवी चालना मिळाली.

GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA) S. J.

"राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर" २०१७–१८

मौजे–पुलई, ता. व जि. – वर्धा

| अ.क्र. | शिबिरार्थ्यांचे नाव | २४.१२.२०१७ | २५.१२.२०१७ | २६.१२.२०१७ | २७.१२.२०१७ | २८.१२.२०१७ | २९.१२.२०१७ | ३०.१२.२०१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | हेमंत विनोदराव आसटकर | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 2) | शुभम सुरेशराव शंभरकर | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 3) | शुभम दिलीपराव राऊत | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 4) | प्रविण मुकुंदराव कांबळे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 5) | सुशिल अशोकराव धुर्वे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 6) | स्वप्नील राजा सुरदुसे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 7) | शुभम मारोतराव किरडे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 8) | गौरव दिलीपराव कालोकार | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 9) | नितिन संतोषराव गुल्हाने | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 10) | सुरज सितापसिंग बेडवाल | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 11) | जगतराम गेंदराम वर्मा | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 12) | प्रतिक सागर चाहांदे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 13) | सुमित सुरेन्द्रराव ढोक | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 14) | अमेय शंकरराव ठाकरे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 15) | ऋषिकेश साहेबराव भोंडे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |

S. J. GRAMSEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

[illegible]

"राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर" २०१७–१८

मौजे–पुलई, ता. व जि. – वर्धा

| अ.क्र. | शिबिरार्थ्यांचे नाव | २४.१२.२०१७ | २५.१२.२०१७ | २६.१२.२०१७ | २७.१२.२०१७ | २८.१२.२०१७ | २९.१२.२०१७ | ३०.१२.२०१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16) | अनुष सुर्यभान गोंडाळे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 17) | सौरभ जिवनराव परसमोडे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 18) | नमिता गुणवंतराव नेहारे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 19) | दिपाली खुशालराव चौधरी | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 20) | गौरी प्रकाशराव ढुमणे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 21) | ऐश्वर्या अंकुशराव सावरकर | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 22) | प्रांजली दिलीपराव बारसागडे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 23) | मुक्ता संतोषराव भोयर | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 24) | स्वाती विनोदराव मून | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 25) | दिपाली मुरलीधर बुधबावरे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 26) | कविता प्रभाकरराव नेहारे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 27) | आंचल नरेशराव चलाख | A.N. Chalakh | A.N. Chalakh | A.N. Chalakh | A.N. Chalakh | A.N. Chalakh | A.N. Chalakh | A.N. Chalakh |
| 28) | शिवानी अविनाशराव गायकवाड | S.A. Gaikawad | S.A. Gaikawad | S.A. Gaikawad | S.A. Gaikawad | S.A. Gaikawad | S.A. Gaikawad | S.A. Gaikawad |
| 29) | दर्शना रमेश नेहारे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 30) | ममता पुंडलीकराव नेवारे | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |

GRAMEEN SEVA MAHAVIDYALAYA PIPRI (WARDHA)

"राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर" २०१७–१८

मौजे–पुलई, ता. व जि. – वर्धा

| अ.क्र. | शिबिरार्थ्यांचे नाव | २४.१२.२०१७ | २५.१२.२०१७ | २६.१२.२०१७ | २७.१२.२०१७ | २८.१२.२०१७ | २९.१२.२०१७ | ३०.१२.२०१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 31) | प्रिती मनोहर गाढवे | P. Gadhave | P. Gadhave | P. Gadhave | P. Gadhave | P. Gadhave | P. Gadhave | P. Gadhave |
| 32) | शितल प्रकाशराव चेंके | Shelke | Shelke | Shelke | Shelke | Shelke | Shelke | Shelke |
| 33) | ऋतुजा किशोरराव हंसकर | R.K. Hanskar | R.K. Hanskar | R.K. Hanskar | R.K. Hanskar | R.K. Hanskar | R.K. Hanskar | R.K. Hanskar |
| 34) | कांचन जनार्धन कानतोडे | R. Kanfade | R. Kantode | R. Kantode | R. Kantode | R. Kantode | R. Kantode | R. Kantode |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

S. Grameen Seva Mahavidyalaya Pipri (Wardha)

श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी (वर्धा)

"राष्ट्रीय एकात्मता व स्वच्छ भारत अभियानासाठी युवाशक्ती शिबिर" २०१७–१८

मौजे–पुलई, ता. व जि. – वर्धा

| अ.क्र. | शिबिरार्थ्यांचे नाव | २४.१२.२०१७ | २५.१२.२०१७ | २६.१२.२०१७ | २७.१२.२०१७ | २८.१२.२०१७ | २९.१२.२०१७ | ३०.१२.२०१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | रोहन राजेंद्र सयाम | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
